
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 7 | APRIL - 2026

# राजेश्वरी किशोर यांच्या ‘निकोबारची नवलाई’ या पुस्तकातील ‘संस्कृती’चे दर्शन

**संध्या शशिकांत खिलारे**
**संशोधक विद्यार्थीनी, एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई.**
**पुणे कॅम्पस, पुणे.**

**सारांश (Abstract):**




साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध असतो. म्हणूनच ‘साहित्य म्हणजे समाजाचा आरसा आहे.’ असे म्हटले जाते. त्याप्रमाणेच साहित्य आणि संस्कृती यांचाही परस्पर संबंध आहे असे मानले जाते. कोणत्याही प्रकारच्या ललित साहित्य कृतीतून संस्कृतीचे दर्शन घडत असते. कारण माणूस ज्या समाजात राहत असतो. त्या समाजाची एक संस्कृती असते. ती संस्कृती त्या लेखकाच्या ललित साहित्यातून आविष्कृत होत असते. मराठी साहित्याचा विचार केल्यास, मराठी साहित्याचा अभ्यास अनेक संशोधक, समीक्षकांनी संस्कृतीच्या अंगाने केला आहे. भारतामध्ये साहित्याच्या सांस्कृतिक अभ्यासाची परंपरा निर्माण होण्यापूर्वी ती पाश्चात्य देशात प्रथम सुरु झाली आहे. त्यामुळे साहित्याच्या सांस्कृतिक अभ्यासाची आद्य परंपरा पाश्चात्य देशात प्रथम सुरु झाली होती. यामध्ये टेलर, राडक्लिफ्फ ब्राऊन, मलिनोवस्की, जोसेफ पिपर, व्हाइट एल. ए. यासारख्या अनेक अभ्यासकांनी साहित्याचा सांस्कृतिक अंगाने अभ्यास केला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात मराठीमध्ये साहित्याचा अभ्यास सांस्कृतिक अंगाने करण्याचा सुरुवात पंडित महादेवशास्त्री जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, गंगाधर बाळकृष्ण सरदार, साने गुरुजी, दुर्गा भागवत, इरावती कर्वे, ह. श्री. शेणोलीकर, प्र. न. जोशी डॉ. यशवंत मनोहर, विलास सारंग, सदा क-हाडे, रा. ग. जाधव, गो. म. कुलकर्णी, आ. ह. साळुंखे, प्रल्हाद लुलेकर, डॉ. आनंद पाटील, केशव तुपे यासारख्या अनेक अभ्यासक, विचारवंत, संशोधकांनी साहित्याचा सांस्कृतिक अभ्यास केला आहे. मराठी साहित्यातील ललित साहित्यातून संस्कृतीचे दर्शन घडत असते. मराठी साहित्यातील ‘प्रवासवर्णन’ या साहित्यप्रकारातून लेखक त्या त्या प्रदेशाच्या, देशाच्या संस्कृतीचे चित्रण करत असताना त्यांच्या लेखनातून संस्कृतीचे दर्शन घडत असते. प्रवासवर्णनांचा अभ्यास सांस्कृतिक अंगाने केले जाऊ शकतो. मराठी साहित्यातील प्रवासवर्णन या साहित्य प्रकाराचा अभ्यास करताना राजेश्वरी किशोर यांच्या ‘निकोबारची नवलाई’ या प्रवासवर्णनाचा अभ्यास सांस्कृतिक अंगाने करायचा आहे. संस्कृतीचा अभ्यास करताना, त्या समाजातील प्रथा, परंपरा, सण, समारंभ, उत्सव, पोशाख, देव, देवता, खाद्यसंस्कृती, आचार विचार, चाली रिती, वर्ग, वंश, लिंग, धर्म, विचारधारा, दंतकथा, श्रद्धा, अंधश्रद्धा, प्रतीके, प्रतिमा, मानवी मूल्ये, भाषा, स्थापत्य कला या सारख्या मूल्यांच्या आधारे संस्कृतीचा अभ्यास केला जाऊ शकतो. प्रस्तुत शोधनिबंधात ‘निकोबारची नवलाई’ या पुस्तकाचा अभ्यास सांस्कृतिक अंगाने करायचा आहे.

**Key Word:** संस्कृती, जारवा, कोरल्स, करेयवा, अंबर, पनाम, पिग फाईट .

**प्रस्तावना :**

साहित्यात समाजाचे प्रतिबिंब पडते असे म्हटले जाते. त्याप्रमाणे साहित्यात संस्कृतीचे प्रतिबिंब पडलेले असते. असे म्हटले जाते. लेखक ज्या समाजात वाढलेला असतो. त्या समाजाची एक संस्कृती असते. ती संस्कृती त्याच्या साहित्यात अवतरते. या बरोबरच प्रवासवर्णन हा साहित्यप्रकार वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असतो. लेखकाने एखाद्या प्रदेशाचे अथवा देशाचे प्रवासवर्णन केलेले असेल, तेव्हा त्याचा प्रवासवर्णनात त्या प्रदेशाची किंवा त्या देशाची संस्कृती आपसूकच प्रतीत होत असते. मराठीमधील लेखिका राजेश्वरी किशोर यांनी निकोबारचा प्रवास करून त्यांनी 'निकोबारची नवलाई'या नावाचे प्रवासवर्णन लिहिले आहे. या प्रवासवर्णनाच्या आधारे संस्कृतीचा अभ्यास करायचा आहे. संस्कृतीचा अभ्यास करताना त्यांचे ठळक असे भौतिक संस्कृती आणि आधिभौतिक संस्कृती असे त्यांचे दोन प्रकार पाहण्यास मिळतात. भौतिक संस्कृती मूर्त स्वरूपात असते. भौतिक संस्कृतीमध्ये लोकांचे राहणीमान, अन्न, पोशाख, घर, अलंकार, कलावस्तू, इत्यादींचा समावेश होतो. तर आधिभौतिक संस्कृतीमध्ये प्रथा, परंपरा, सण, उत्सव, रिती रिवाज, ज्ञान, भाषा, चिन्हे, प्रतीके, लोकाचार, कायदा, लोक रीत, कौशल्ये, नियमने, मूल्ये, देव, धर्म, शासन, अर्थ, कुटुंब, शिक्षण, लोकनीती, आदर्श, कल्पना, श्रद्धा, विश्वास, इत्यादी मूल्ये अभौतिक संस्कृतीमध्ये पाहण्यास मिळतात. या मूल्यांच्या आधारे 'निकोबारची नवलाई' या पुस्तकातील संस्कृतीचा अभ्यास केला जाणार आहे.

**साहित्याचा आढावा ( Review of Literature)**

मराठी साहित्यात विविध प्रकारचे साहित्यप्रकार आहेत. त्यांचा अभ्यास विविध अभ्यास पद्धतींच्या सहाय्याने केला जातो. राजेश्वरी किशोर यांचे 'निकोबारची नवलाई' या नावाचे प्रवासवर्णनपर पुस्तक आहे. या प्रवासवर्णनपर पुस्तकाचा अभ्यास सांस्कृतिक अभ्यास पद्धतीने करायचा आहे. सांस्कृतिक अभ्यास म्हणजेच संस्कृतीचा अभ्यास होय. प्रस्तुत शोधनिबंधात सांस्कृतिक पद्धतीने अभ्यास करताना या पुस्तकातून आविष्कृत झालेल्या संस्कृतीचा अभ्यास करायचा आहे. मराठी साहित्यात यापूर्वी अनेक संशोधकांनी साहित्याचा अभ्यास सांस्कृतिक अंगाने केला आहे. यामध्ये प्रा. डॉ. देवानंद सोनटक्के यांनी 'साठोत्तरी मराठी कादंबरीचा सांस्कृतिक अभ्यास' या विषयावर पीएच. डी. साठी संशोधन केले आहे. प्रा. डॉ. सतीश बडवे यांनी '१९९० नंतरच्या मराठी कवितेचा सांस्कृतिक अभ्यास' या विषयावर पीएच. डी. साठी संशोधन केले आहे. तर प्रा. डॉ. जे. बी. शिंदे यांनी 'दलित आत्मचरित्राचा सांस्कृतिक अभ्यास' या विषयावर पीएच. डी. साठी संशोधन केले आहे. या सारख्या अनेक संशोधकांनी साहित्याचा अभ्यास सांस्कृतिक अंगाने केला आहे. आजच्या काळात अनेक संशोधकांनी, विचारवंतांनी साहित्याचा अभ्यास सांस्कृतिक अंगाने करण्याचे ठरविले आहे. मात्र प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराचा अभ्यास सांस्कृतिक अंगाने झाला नाही. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात प्रवासवर्णन या साहित्यप्रकारातील राजेश्वरी किशोर यांच्या 'निकोबारची नवलाई' या पुस्तकाचा अभ्यास सांस्कृतिक अंगाने करण्यात येणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of Research )**

१) साहित्य आणि संस्कृती यांचे परस्पर संबंध तपासणे

२) प्रवासवर्णन आणि संस्कृती यांचा परस्पर संबंध तपासणे.

३) 'निकोबारची नवलाई' मधील संस्कृतीचे प्रकार तपासणे.

४) 'निकोबारची नवलाई' या पुस्तकाच्या आधारे निकोबार या बेटावरील संस्कृतीचा अभ्यास करणे.

## संशोधनाची व्याप्ती (Research Scope) :

प्रस्तुत शोधनिबंधात राजेश्वरी किशोर यांच्या 'निकोबारची नवलाई' या प्रवासवर्णनपर पुस्तकाचा सांस्कृतिक अभ्यास करायचा आहे. या पुस्तकात भारतातील बंगालच्या उपसागरात असलेल्या 'निकोबार' या बेटावर राहणाऱ्या लोकांच्या संस्कृतीचा अभ्यास करायचा आहे. हा अभ्यास करताना तेथील माणसे, त्यांची संस्कृती, त्यांचे लोकजीवन, त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण या सर्वांचा अभ्यास या पुस्तकाच्या आधारे केला जाणार आहे. परंतु या पुस्तकात लेखिका राजेश्वरी किशोर यांनी तेथील लोकांच्या जीवनातील सर्व पैलूंचा अभ्यास तटस्थपणे केला आहे. निकोबारी लोकांच्या चाली रिती, कुटुंबपद्धती, माणसे, त्यांचे सण, उत्सव, अन्न, पोशाख, जीवनाकडे त्यांचा पाहण्याचा दृष्टिकोण या सर्वांचे चित्रण त्यांच्या 'निकोबारची नवलाई' या पुस्तकात आला आहे. या सर्वांचा अभ्यास या सांस्कृतिक अंगाने या शोधनिबंधांत केला जाणार आहे.

## संशोधन पद्धती (Research Methodology):

१) या शोधनिबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

२) प्राथमिक स्त्रोत म्हणून राजेश्वरी किशोर यांच्या 'निकोबारची नवलाई' या पुस्तकाचा अभ्यास केला जाणार आहे.

३) प्रस्तुत अभ्यास समृद्ध होण्यासाठी मराठीमधील सांस्कृतिक अभ्यासासाठी त्या विषयांवरील ग्रंथांचा अभ्यास केला जाणार आहे.

## संशोधनाचे अभ्यास क्षेत्र ( Area of Research) :

ललित साहित्यातील कथा, कादंबरी, नाटक, कविता, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन या सारख्या ललित साहित्यात समाजाचे वास्तव चित्र पाहण्यास मिळते. तसेच त्यामधून त्या त्या ठिकाणच्या संस्कृतीचेही दर्शन घडत असते. प्रवासवर्णन हा साहित्यप्रकार वस्तुनिष्ठ स्वरूपाचा साहित्यप्रकार आहे. लेखक जेव्हा एखाद्या प्रदेशाचा अथवा एखाद्या देशाचा प्रवास करत असतो. त्यावेळी त्याला त्या प्रदेशाचे किंवा देशाचे समाज आणि संस्कृतीचे वास्तव दर्शन घडत असते. त्यामुळेच ललित साहित्यातील 'प्रवासवर्णन' या साहित्यप्रकारामधून संस्कृती आविष्कृत होत असते. प्रा. वा. ल. कुलकर्णी प्रवासवर्णनासंबंधी म्हणतात की, "प्रत्येक स्थळांशी संलग्न असे एक वातावरण असते. हे वातावरण भौगोलिक परिस्थितीने, इतिहासाने, दंतकथांनी, संस्कृती प्रवाहांनी, नानाविध माणसांच्या मनांनी आणि इतर नाना प्रकारच्या नामीक व अनामिक गोष्टींनी निर्माण केलेले असते. ह्या वातावरण खेरीज त्या स्थळांची कल्पना निर्जीव ठरते. त्यानेच त्या स्थळाला त्यांचे स्वत:चे असे एक जीवंत व्यक्तिमत्व लाभत असते. हे जणू त्यांचे प्राणतत्व बनते."१ प्रवासी म्हणून लेखक ज्यावेळी त्या स्थळाला भेट देत असतो. त्यावेळी त्या स्थळाला एक ओळख प्राप्त झालेली असते. ही ओळख इतिहास, भूगोल, निसर्ग, संस्कृती यांनी ते ठिकाण प्रसिद्ध पावलेले असते. म्हणून त्यातून संस्कृती आपल्याला पाहण्यास मिळत असते. मराठी साहित्यातील राजेश्वरी किशोर यांच्या 'निकोबारची नवलाई' या प्रवासवर्णनात त्यांनी बंगालच्या उपसागरातील 'निकोबर' या बेटांचा प्रवास केला आहे. या प्रवासात त्यांना त्या ठिकाणी अनेक भौतिक आणि आधिभौतिक संस्कृतीची मूल्ये पाहण्यास मिळाली आहेत.

संस्कृतीचा अभ्यास करताना दोन प्रकारच्या संस्कृतींचा अभ्यास करावा लागतो. यामध्ये भौतिक संस्कृती आणि आधिभौतिक संस्कृती अशी त्यांची नावे आहेत. भौतिक संस्कृतीमध्ये त्या ठिकाणची माणसे, त्यांचे अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या मूल्यांचा त्यामध्ये समावेश होत असतो. संस्कृतीच्या वाटचालीत त्या ठिकाणच्या माणसांना महत्व असते. माणूस हा संस्कृतीचा एक घटकच आहे असे मानले आहे. निकोबारच्या प्रवासात लेखिकेला विविध प्रकारची माणसे भेटली आहेत. या माणसांच्यामध्ये मूळ आदिवासी आणि त्या ठिकाणी सध्या वास्तव्यास असणारी स्थानिक माणसे त्यांनी भेटली होती. त्या ठिकाणी असणाऱ्या मूळ आदिवासीमध्ये ग्रेट अंदमानी, जारवा, ओंगी, सेंटनली, निकोबारी अशा प्रकारची माणसे त्यांना भेटली आहेत. या माणसांच्या संबंधी लेखिका राजेश्वरी किशोर म्हणतात की, "अंदमान बेटावरील आदिवासीपेक्षा निकोबार बेटावरील आदिवासी परदेशी पाहुण्यांशी मैत्रीपूर्ण वागणूक ठेवायचे आणि ते अतिशय साधे सरळ वागायचे."२ या विधानातून त्या ठिकाणची माणसे सुसंस्कृत असल्याचे दिसून येते. त्यांच्या जगण्यात संस्कृती डोकावत असते. ही माणसे नेहमी आनंदी राहण्याचा प्रयत्न करत असतात. भौतिक संस्कृतीमध्ये अन्न हा घटक महत्वाचा असतो. जगभरातील माणसांचे अन्न हे परस्परांपेक्षा भिन्न असते. त्यामध्ये त्या प्रदेशाचे किंवा देशातील भौगोलिक प्रदेशावर त्या ठिकाणचे अन्न अवलंबून असते. निकोबारच्या लोकांची खाद्यसंस्कृती संबंधी लेखिका म्हणतात की, "समुदकिनारी राहत असल्याने जलचर तसेच जंगलातील रानडुक्कर मारून खायचे किंवा जमिनीतील कंदमुळे आणि उपलब्ध झाडांची फळे खाऊन आणि मध पिऊन त्यांचा उदरनिर्वाह होत असे."३ प्रत्येक समाजाच्या संस्कृतीमध्ये खाद्यसंस्कृती महत्वाची मानली जाते. भौतिक संस्कृतीमध्ये निकोबारच्या लोकांच्या पोषाखाला वैशिष्ट्यपूर्ण असे स्थान आहे. त्या त्यांच्या समाजातील जारवा, सेंटीनली या सारख्या आदिम जमाती आजही आदिम संस्कृतीत वावरत आहेत. जारवा हा समाज आजही नग्न अवस्थेत राहत असतो. काही प्रसंगी तो लज्जा रक्षणासाठी झाडांची पाने आपल्या कमरेभोवती गुंडाळत असतो. यासंबंधी लेखिका राजेश्वरी किशोर म्हणतात की,"शरीर सजविण्यासाठी झाडांच्या सालीच्या माळा किंवा दागिने वापरतात. अंग झाकायला ताडीच्या जातीच्या झाडांची किंवा बांबूच्या झाडांची साले उपयोगात आणतात. शिंपले आणि प्रवाळ यांचा उपयोग दागिने म्हणून करतात. पुरुष एका वैशिष्ट्यपूर्ण झाडाच्या सालीचे शिरस्त्राण वापरतात."४ जगभरातील माणसांना आपण सुंदर दिसावे यासाठी ते दाग दागिने वापरत असतात. निकोबार बेटावरील आदिम संस्कृतीशी संबंध असणाऱ्या जमाती समुद्रातील शंख, शिंपले यांच्या पासून ते दागिने बनवितात. निकोबारमधील माणसे ही अंधश्रद्धा पाळणारी आहेत असे दिसते. त्यांच्या मनात अदृश्य दुष्ट शक्ति पासून आपणास धोका आहे असे त्यांना वाटते. म्हणून ते आपली त्यापासून सुटका व्हावी यासाठी ती माणसे काय करतात या संबंधी लेखिका म्हणतात की, "शरीरावर काढलेल्या लाल पांढऱ्या मातीच्या चित्रामुळे जारवा वेगळे उठून दिसतात. वेगवेगळ्या सममीत आकृत्या अंगावर काढतात. आणि डोळ्याभोवती, चेहऱ्यावर पांढऱ्या रंगाचे मातीने लेप लावतात." यामुळे आपली दुष्ट शक्तीपासून सुटका होईल अशी त्यांची भाबडी श्रद्धा असल्याचे त्यांच्या या वर्तनातून लक्षात येते. अशाप्रकारच्या अनेक प्रथा परंपरा या निकोबारी समाजात असल्याचे या पुस्तकांतू पाहण्यास मिळते. हा समाज जगापासून खूपच दूर आहे. त्यांच्यात शिक्षणाचा अभाव असल्याने अशा प्रकारच्या प्रथा, परंपरा या समाजात दिसतात. परंतु हा समाज आदिम असला तरी काही बाबतीत आपल्यापेक्षा प्रगत असल्याचे दिसून येते. या समाजात काही ठिकाणी मातृसत्ताक समाजपद्धती आहे. तर काही ठिकाणी पुरुषप्रधान समाजपद्धती आहे. विवाह संस्थेबाबत त्यांच्या समाजात मोकळेपणा पाहण्यास मिळतो. या समाजातील तरुण मुले, मुली आपला विवाह स्वतःच ठरवितात. त्यांच्या लग्नाला त्यांच्या आई वडिलांची परवानगी घेण्याची गरज नसते. त्यांच्या लग्नात हुंडा दिला अथवा घेतला जात नाही. परंतु लग्नाची भेट म्हणून त्यांनी पाळलेले डुक्कर दिले जाते. निकोबारी समाजातील माणसे आनंदी वृत्तीची असतात. ती आपल्या कुटुंबातील स्त्रियांना मानाचे आणि प्रतिष्ठेचे स्थान देतात. या संबंधी लेखिका म्हणते की,"एखादी व्यक्ती मृत्यू

पावल्यावर त्या व्यक्तीचे सगळे कपडे, त्यांच्या वस्तू, त्यांचे दागिने शवाबरोबरच पुरले जातात." ६ म्हणजेच त्या व्यक्तीच्या नंतर त्यांच्या वस्तू, दाग दागिने यांच्यावरून त्यांच्यात भांडणे नकोत. त्यांच्या समाजातील माणूस मेल्यावर त्याला जमिनीत पुरले जाते. परंतु त्यांची आठवण आपणाला सदैव राहावी यासाठी ही माणसे त्यांचे स्मारक करतात. या विषयी लेखिका म्हणतात की, "त्या व्यक्तीच्या चणीचा लाकडी पुतळा बनवला जातो. काही काळानंतर त्याचा सांगाडा बाहेर काढला जातो. त्यांची कवटी त्या लाकडाच्या धडावर लावली जाते. आणि मग त्याच्या चेहऱ्याचा आकार म्हणजेच 'मुखवटा' कवटीवर करून नैसर्गिक रंगांनी रंगवला जातो. आणि तो पुतळा सजविला जातो. या पुतळ्यामध्ये त्यांना त्यांचे पूर्वज दिसतात. या पुतळ्याची पूजा करून जीवित जीवांचे स्वास्थ्य चांगले राहावे. यासाठी त्याला ओवाळले जाते. त्यांची पूजा करताना आपले मन आणि आत्मा शुद्ध, स्वच्छ, आनंदी असणे हितकारक असते. असे मानले जाते. या सजविलेल्या प्रतिकृतीला निकोबारी भाषेत 'करेयवा' असे म्हणतात."७ अशा निकोबारी लोक राहण्यासाठी उत्तम प्रकारची घरे बांधत असतात. ही घरे एसी सारखी थंडगार असतात. झोपडीपेक्षा उत्तम प्रकारची घरे बांधण्याची त्यांचे कला कौशल्य वाखणण्यासारखी असते. घरासाठी बांबू, लाकडाच्या फळ्या यांचा उपयोग करतात. अशा पद्धतींची त्यांची भौतिक संस्कृती असते. आधिभौतिक संस्कृतीची मूल्ये ही अमूर्त स्वरूपाची असतात. ती आपल्या डोळ्यांना दिसत नाहीत. परंतु त्यांचे अस्तित्व समाजात पाहण्यास मिळत असते. निकोबारी समाजात अनेक प्रकारच्या चाली, प्रथा आपाहण्यास मिळतात. त्यांच्या कुटुंबव्यवस्थेचा विचार केल्यास पूर्वीच्या काळात, ती एकत्रित पद्धतीची होती. त्यांच्या या कुटुंबव्यवस्थेला 'तूहेत' असे म्हणतात. या तूहेतांचा एक प्रमुख असतो. या तूहेताच्या सांगण्यावरुन त्यांचे सण साजरे केले जातात. या समाजाच्या चाली रिती, सणाविषयी सविस्तर माहिती देताना राजेश्वरी किशोर म्हणतात की, "प्रत्येक समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम, लोकनृत्य, समूहगान, विविधगुणदर्शन आणि शेवटी डुक्कर पार्टी असायचीच. पिग फेस्टिवलमध्ये पिग फाईट हा एक महत्वाचा खेळ खेळला जातो. आपल्याकडचे मोठ्यातमोठे तगडे डुक्कर मोकळ्या मैदानात सोडायचे आणि त्यांच्यात मारामारी लावायची. प्रत्येक बेटावरील पद्धत वेगळी असावी बहुदा" निकोबारी लोक तूहेताच्या सांगण्यावरून डुकरांच्या शर्यती लावतात. त्या शर्यतीना 'पिग फाईट' असे म्हटले जाते. हा खेळ महत्वाचा असतो. निकोबारी लोकांच्या मेजवाणीचे वर्णन करताना लेखिका सांगतात की," घरातील एका पाळीव डुकराचा बळी द्यायचा आणि त्याचे रक्त सगळ्या पुरुषांच्या अंगावर, कपड्यांवर शिंपडून द्यायचे. कापलेल्या डुकराच्या मांसापासून विविध पदार्थ बनवून मेजवानी करायची. अंगावर रक्ताचे डाग तसेच ठेवून व्हालीबॉल खेळायचे. संध्याकाळी सर्व कुटुंबाने प्रार्थनेसाठी एकत्र जमायचे. किती प्रेमळआणि भावनाप्रधान लोक ही .."९ म्हणजेच त्यांच्या कुटुंबात सण समारंभ साजरे केले जातात. सणासमारंभाच्या काळात निकोबारी लोक एकत्र येवून नृत्य करतात. त्यांच्या या नृत्यात विविध प्रकार असतात. निकोबारच्या नानकोवरी या बेटावर राणू चंगा यांनी राज्य केले होते. त्या बेटावर त्यांच्याकडे आलेल्या विशेष पाहुण्यांचे आदरातिथ्य केले जाते. या संबंधी लेखिका म्हणतात की, "बेटावर आलेल्या विशेष अतिथीना त्यांच्याकडून घरी येण्यासाठी खास आमंत्रण असते. अतिथीना विविध प्रकारचे खाद्यपदार्थ देऊ केले जातात. मी असे ऐकले आहे की, त्यांच्याकडे वापरली जाणारी क्रोकरी, दारूचे ग्लास खूप चांगल्या प्रतीचे असतात. अतिथी भेटून परत जाताना त्यांच्या डोक्यावर घरी बनविलेले खोबऱ्याचे तेल लावण्याची पद्धत आहे." १० नानकोवरी या बेटावर पाहुण्यांचे स्वागत करण्याची पद्धत आहे. या लोकांच्यामध्ये एकमेकांचे आदरातिथ्य करण्याची संस्कृती त्यांच्यामध्ये असल्याचे दिसून येते. मात्र 'चौरा' या बेटावर मात्र बाहेरच्या माणसांना प्रवेश नाकारला जातो. निकोबारी लोकांच्या जीवनात नारळाचे स्थान कल्पवृक्षासारखे आहे. निकोबारी समाज आजही अप्रगत समाज आहे. त्यांचा प्रगत समाजाशी फारसा संबंध नाही. आदिम अवस्थेत असूनही हा समाज आपली संस्कृती टिकवून ठेवण्याचे आव्हान पार पाडत आहे.

**निष्कर्ष :**

१. मराठी साहित्याला सांस्कृतिक अभ्यासाची मोठी परंपरेला लाभलेली आहे.

२. ललित साहित्यात संस्कृतीचे प्रतिबिंब पडत असते.

३. निकोबारची नवलाई या पुस्तकात संस्कृतीची मूल्ये पाहण्यास मिळतात.

४.निकोबारची नवलाईमध्ये भौतिक संस्कृतीमधील अन्न,वस्त्र,निवाराही मूल्ये पाहण्यास मिळतात.

. निकोबारची नवलाईमध्ये प्रथा,परंपरा,सण, समारंभ,चाली, रिती ही मूल्ये पाहण्यास मिळतात.

६. निकोबारची नवलाई या पुस्तकात निकोबारी समाजाची संस्कृती पाहण्यास मिळते.

संदर्भ :

१. कुलकर्णी वा.ल. : वाटचाल, मौज प्रकाशन, मुंबई, प. आ. १९६६,पृ.३

२. किशोर राजेश्वरी : निकोबारची नवलाई, राजहंस प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती २०२०, पृ.२१

३. उनि पृ.३२

४. उनि पृ.३६

. उनि पृ.३७

६. उनि पृ.६८

७. उनि पृ.७०

. उनि पृ.१३४

९. उनि पृ.१३४

१०. उनि पृ.१४३